# प्रेस नोट दिनांक २८.०४.२०१८.

## सिंधुदुर्ग स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेकडून महामार्गावरील उभ्या असलेल्या ट्रक मधुन चोरी करणारे परराज्यातील (**गुजरात गोध्रा ताडपत्री गँग**) चोरटयांच्या टोळीला जेरबंद.

---

दि.०१.०४.२०१८ रोजी रात्रौचे दरम्याने कुडाळ राज हॉटेल समोर व तरळे कोचरेकर पेट्रोलपंप येथे उभ्या असलेल्या ट्रकची मागील ताडपत्री फाडून आंतील खसखस, इलेक्ट्रिक सामान व डिझनी फ्रोझन हॅण्डवॉश असा एकूण ७, ५३,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल अज्ञात चोरटयांनी चोरुन नेला होता. या घटनेबाबत वर्तमानपत्रात महामार्गावरील ट्रकची ताडपत्री कापुन चोरी करणारी टोळी सक्रिय झाली असलेबाबत बातमी प्रसिद्ध झालेली होती. याबातमीच्या आधारे मा. पोलीस अधीक्षक सिंधुदुर्ग श्री दिक्षीत गेडाम व मा. अपर पोलीस अधीक्षक सिंधुदुर्ग श्री प्रकाश गायकवाड यांनी स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा सिंधुदुर्गचे पोलीस निरीक्षक श्री प्रल्हाद पाटील यांना मार्गदर्शन करुन सदर गुन्हे उघडकीस आणण्याबाबत आदेश दिलेले होते. त्याप्रमाणे स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा पोलीस पथकाने सदर दोन्ही गुन्हयाचे घटनास्थळी भेट देवुन सदर दोन्ही गुन्हयाची पद्धत एकच असल्याचे व दोन्ही गुन्हे एकाच चोरटयांचे टोळीने केला असावा असा निष्कर्ष काढला. व सदरची चोरी ही गुजरात गोध्रा ताडपत्री गँगनेच केली असावी असे प्रथमदर्शनी दिसुन आले. कणकवली तरळा येथील गुन्हयात चोरटयांनी एक ट्रक व एक क्रेटा गाडीचा वापर केल्याची माहीती पोलीस पथकास मिळाली होती. परंतु दोन्ही वाहनांचे नंबर मिळून आलेले नव्हते. म्हणून चोरटे हे महामार्गावरील उभ्या ट्रक मधुन सामान नेत असावेत असा निष्कर्ष काढून गोपनीय माहीती मिळवुन गुन्हयात GJ-35-B-5379 ही क्रेटा गाडी निष्पन्न केली. सदरची गाडीची डिटेल्स घेता ती गुजरात गोध्रा येथील असल्याचे तपासात निष्पन्न झाले. तसेच अशाच प्रकारचे गुन्हे करणारे सराईत चोरटयांची माहीती घेता काही चोरटे हे गुजरात गोध्रा येथील असल्याचे समजले. यावरुन स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस पथक व पोलीस उप निरीक्षक श्री बापु खरात असे गुजरात गोध्रा येथे जावुन मिळालेल्या माहीतीच्या आधारे तपास करुन आरोपी **मुस्ताक अब्दुल भागालीया ऊर्फ फटाकी वय ३७ वर्षे रा. गोध्रा, राज्य गुजरात** यास

शिताफिने ताब्यात घेवुन तपास केला असता त्याने आपण व आपला साथीदार **सुलेमान ऊर्फ सुलीया अब्दुलगणी कठडी रा गोध्रा राज्य गुजरात** यांनी मिळून वरील गुन्हे आपणच केल्याची कबुली दिली व चोरीचा माल अक्कलकुवा जि. नंदुरबार येथील व्यापारी **विनोद भगवानदास बनिया ऊर्फ वाणी** यास विकल्याची माहीती दिली होती त्यावरुन पोलीसांनी चोरीचा माल घेणाऱ्या व्यापाऱ्यास ताब्यात घेतले. व कुडाळ पोलीस ठाणे गुन्हा रजि नंबर १०२/१८ भा दं वि कलम ३७९ या गुन्हयातील चोरीस गेलेली इलेक्ट्रॉनिक्स वस्तु १,७३,९३०/- रुपये किंमतीचा माल यातील आरोपी मुस्ताक अब्दुल भागालीया ऊर्फ फटाकी याने काढून दिला. वरील आरोपीत याचेकडून गुन्हयात वापरलेली क्रेटा गाडी GJ-35-B-5379 व ट्रक नंबर GJ-16-W-4379 यांचेसह एकूण २३,७३,९३०/- रुपये किंमतीचा माल जप्त करण्यात आलेला आहे.अटक आरोपीत यांना मा. न्यायालयात हजर केले असता त्यांची दि.०२.०५.२०१८ रोजी पर्यंत पोलीस कस्टडी मंजुर करण्यात आलेली आहे.

सदर कारवाई ही मा. पोलीस अधीक्षक सिंधुदुर्ग श्री दिक्षीत गेडाम व मा. अपर पोलीस अधीक्षक सिंधुदुर्ग श्री प्रकाश गायकवाड यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस निरीक्षक श्री प्रल्हाद पाटील, पोलीस उप निरीक्षक, बापु खरात, पोहेकॉ/सुधीर सावंत, पोहेकॉ/आशिष गंगावणे, पोना/संतोष सावंत, पोना/अनुपकुमार खंडे, पोना/कृष्णा केसरकर, पोकॉ/सत्या पाटील, पोकॉ/प्रथमेश गावडे, पोना/ प्रशांत कासार यांनी केलेली आहे.

(दिक्षीत गेडाम)

पोलीस अधीक्षक, सिंधुदुर्ग

---